ePaper
मग ढेकळांचे पंचनामे करायचे का? कृषिमंत्र्यांचं बेताल विधान



| वर्ष - 8 । अंक - 293 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

www.mahaenews.com | शनिवार, दि. 31 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत


- सर्व गोष्टी बाजूला ठेवून मैदानात उतरतो
- मुंबईचं सहाव्या ट्रॉफीच्या दिशेनं पाऊल!
- दहशतवादाला सापासारखे ठेचून काढू
- पूंछमधील पीडितांना आर्थिक मदत


## आयएनएस विक्रांत' वरून संरक्षणमंत्र्यांची पाकला ललकारले

# पाकिस्तानचे आता, चार तुकडे होणार!

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा जाहीर सभांमध्ये पाकवर हल्लाबोल : काही कराल, तर याद राखा!



। पूंछ / नवी दिल्ली । प्रतिनिधी । महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी जाहीर सभांमध्ये बोलताना, गृहमंत्री अमित शहा सैन्याबरोबर संवाद साधताना आणि संरक्षणमंत्री राजनाथ सिंह नौदलाशी चर्चा करताना एका सुरात बोलून गेले.. यापुढे पाकिस्तानने काही आगळीक केली, तर त्यांचे चार तुकडे पडतील. भारत गप्प बसणार नाही आणि ही कारवाई आत्तापर्यंतची सर्वात मोठी कारवाई होईल!**

### हतबल पाकड्यांची मस्ती कायम..

'ऑपरेशन सिंदूर' नंतर भारताने केलेल्या कारवाईमुळे संपूर्ण अवसान गळून गेलेले पाकचे राजकारणी, त्यांचे सैनिक आणि तेथील नागरिक हतबल झालेले असले तरीही भारताला धडा शिकवण्याची भाषा अजूनही बोलत आहेत. मोदी, शाह आणि राजनाथसिंह या तिघांनी वेगवेगळ्या ठिकाणी त्यांचा खरपूस समाचार घेतला आणि भारताची भूमिका स्पष्ट केली.

### पाकड्यांना थेट इशारा

राजनाथ सिंह यांनी 'आयएनएस विक्रांत' वरुन पाकला थेट इशारा दिला. 'ऑपरेशन सिंदूर' नंतर आम्ही गप्प बसलो नसतो, तर पाकिस्तानचे चार तुकडे झाले असते', असे म्हणत राजनाथसिंह यांनी पाकला चक्क तंबी दिली आहे. आता तरी गप्प बसा, नाहीतर देशाचे चार तुकडे पाडू असे ते म्हणाले.

### पाकला मोठा धडा शिकवला, तरीही

पहलगाम येथील भ्याड दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' द्वारे पाकला त्यांच्याच शब्दात धडा शिकवला. या कारवाईमध्ये भारतीय हवाई दलाने महत्त्वाची भूमिका बजावली होती. दरम्यान, आता राजनाथ सिंह यांनी नौदलाबाबत एक मोठा खुलासा केला आहे. लढाऊ जहाज 'आयएनएस विक्रांत' वर त्यांनी नौदल अधिकाऱ्यांची भेट घेतली आणि नौदलाबद्दल महत्त्वाची माहिती दिली.

### 'ऑपरेशन सिंदूर' संपलेले नाही..

राजनाथ सिंह म्हणाले, 'ऑपरेशन सिंदूर' अद्याप संपलेले नाही. जर पाकिस्तानने काही चूक केली, त यावेळी त्याला सावरण्याची संधीही मिळणार नाही. आमचे नौदल त्सुनामी आणू शकते. पाकला असे उत्तर देऊ की, त्याने कधी विचारही केला नसेल.

### चर्चा फक्त पाकव्याप्त काश्मीरवर..

पाक वारंवार चर्चेचा प्रस्ताव देत आहे. पाकिस्तानी पंतप्रधान चर्चेबद्दल बोलले. पण, आमची स्पष्ट भूमिका आहे की, यापुढे फक्त दहशतवाद आणि पाकव्याप्त काश्मीर बाबतच चर्चा होणार, पाकला जाणारे नद्यांचे पाणी भारताने अडवल्यामुळे तेथे प्रचंड असंतोष असून नागरिकांचा पाक सरकारवर मोठा दबाव आहे, असेही ते म्हणाले.

### पाकचे चार तुकडे होतील

राजनाथ सिंह पुढे म्हणाले की, पाकिस्तानने हाफिज सईद आणि मसूद अझहरला भारताच्या स्वाधीन करावे. हाफिज सईद मुंबई हल्ल्यात सहभागी होता आणि त्याला जबाबदार धरले जाईल. दहशतवादाविरुद्ध आम्ही अशी कारवाई करू, ज्याचा पाक विचारही करू शकत नाही. यावेळी जर पाकिस्तानने पुन्हा काही आपल्या कुरापती सुरू केल्या, तर नौदलदेखील युद्धात उतरेल, अन् मग पाकिस्तानचे काय होईल, हे देवालाच माहीत असे उद्गार त्यांनी काढले.

### 1971 ची आठवण आहे का?

१९७१ मध्ये जेव्हा भारताचे नौदल आले होते, तेव्हा पाकिस्तानचे दोन तुकडे झाले होते. आता 'ऑपरेशन सिंदूर' मध्ये नौदल आले असते, तर पाकिस्तानचे चार तुकडे झाले असते, असा मोठा दावाही त्यांनी केला. अजून चार तुकडे झाले नाहीत, पण ते होऊ शकतात, अशी तंबीही त्यांनी पाकला दिली.

### पंतप्रधान, गृहमंत्री, संरक्षणमंत्री एकाच दिवशी 'ॲक्शन मोड' वर..

पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि संरक्षणमंत्री राजनाथ सिंह एकाच दिवशी 'ॲक्शन मोड' वर होते. ते ज्या ठिकाणी होते, तेथे थेट पत्रकार परिषद, जाहीर सभा किंवा सैन्याबरोबर बातचीत करताना त्यांचे 'टार्गेट' एकच होते, ते म्हणजे पाकिस्तान! यापुढे काही कारस्थान केले किंवा आगळीक केली, तर पाक पुन्हा उभा राहणार नाही आणि त्यांचे चार तुकडे झालेले दिसतील, असा थेट इशारा या तिन्ही ज्येष्ठ नेत्यांनी पाकिस्तानला दिला. आम्ही कुरापत काढणार नाही, आणि काढलेली खपवून घेणार नाही, यातच त्यांनी दिलेली तंबी किती धडकी भरवणारी होती, हे लक्षात येईल..

# कोणाचीही हयगय करणार नाही!

## वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणी मुख्यमंत्र्यांची ग्वाही

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणातील आरोपी नीलेश चव्हाण याला नेपाळ येथून अटक करण्यात आली असून, या प्रकरणात कोणाचीही हयगय केली जाणार नाही, अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी पुण्यात पत्रकारांशी बोलताना दिली.**





### नीलेश चव्हाणला अटक

त्या तक्रारीत किती तथ्य आहे याची चौकशी करण्यास सांगितले आहे. या प्रकरणाच्या तपासात कोणीही गडबड करू नये. तसेच, तपासावर दबाव आणू नये यासाठी आम्ही काही निर्णय घेतले आहेत. ज्या काही शस्त्र परवानग्या देण्यात आल्या आहेत. त्याचा आढावा घेण्यात येईल. कोणत्याही पद्धतीने चुकीची परवानगी दिली गेली असेल, तर ती रद्द केली जाईल.’लाडकी बहिणीच्या योजनेत लाभ घेणाऱ्या २ हजार ६०० महिला सरकारी कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या असल्याचे समोर आले आहे. त्याबाबत फडणवीस म्हणाले, ‘लाडकी बहीण योजनेच्या निकषांमध्ये न बसणाऱ्या काही महिलांनी त्याचा लाभ घेतला आहे. त्या संदर्भातील चौकशी सुरू करण्यात आली आहे

बालगंधर्व रंगमंदिर येथे एका कार्यक्रमानंतर फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधताना ही भूमिका मांडली. या प्रकरणातील आरोपी नीलेश चव्हाणला करण्यात आलेली अटक ही चांगली कारवाई आहे. या प्रकरणात आरोपींना कडक शिक्षा झाली पाहिजे, असा सरकारचा प्रयत्न आहे. त्यामुळे या प्रकरणात कोणालाही सोडले जाणार नाही, असे फडणवीस यांनी सांगितले.हगवणे कुटुंबीयांना शस्त्र परवाने देताना विशेष पोलीस महानिरीक्षक जालिंदर सुपेकर यांच्यावर आरोप होत आहेत. ते स्वतः हगवणे कुटुंबीयाचे मामा आहेत, याकडे लक्ष वेधता मुख्यमंत्री म्हणाले, ‘अशा प्रकारची तक्रार आली आहे. त्या तक्रारीत किती तथ्य आहे याची चौकशी करण्यास सांगितले आहे. या प्रकरणाच्या तपासात कोणीही गडबड करू नये. तसेच, तपासावर दबाव आणू नये यासाठी आम्ही काही निर्णय घेतले आहेत. ज्या काही शस्त्र परवानग्या देण्यात आल्या आहेत. त्याचा आढावा घेण्यात येईल. कोणत्याही पद्धतीने चुकीची परवानगी दिली गेली असेल, तर ती रद्द केली जाईल.’लाडकी बहिणीच्या योजनेत लाभ घेणाऱ्या २ हजार ६०० महिला सरकारी कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या असल्याचे समोर आले आहे. त्याबाबत फडणवीस म्हणाले, त्या संदर्भातील चौकशी सुरू करण्यात आली आहे.’ ‘निकषांमध्ये न बसताही लाभ घेणाऱ्यांची नावे कमी करण्यात येतील. त्यानुसार यादी करण्याचे काम सुरू झाले असून, ते अद्यापही संपलेले नाही. तसेच, राज्य महिला आयोगाच्या काही जागा रिक्त आहेत त्या रिक्त जागा लवकरच भरण्यात येईल,’ असेही फडणवीस यांनी सांगितले. बालगंधर्व रंगमंदिर येथे एका कार्यक्रमानंतर फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधताना ही भूमिका मांडली. या प्रकरणातील आरोपी नीलेश चव्हाणला करण्यात आलेली अटक ही चांगली कारवाई आहे. या प्रकरणात आरोपींना कडक शिक्षा झाली पाहिजे, असा सरकारचा प्रयत्न आहे. त्यामुळे या प्रकरणात कोणालाही सोडले जाणार नाही, असे फडणवीस यांनी सांगितले. हगवणे कुटुंबीयांना शस्त्र परवाने देताना विशेष पोलीस महानिरीक्षक जालिंदर सुपेकर यांच्यावर आरोप होत आहेत. ते स्वतः हगवणे कुटुंबीयाचे मामा आहेत, याकडे लक्ष वेधता मुख्यमंत्री म्हणाले.

# पुणे मेट्रोच्या विस्ताराला गती मिळणार

## मुरलीधर मोहोळ व केंद्रीय मंत्री मनोहर लाल खट्टर यांची भेट

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वनाज ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली या मेट्रोच्या विस्तारित टप्प्यांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी देणे तसेच खराडी-हडपसर-स्वारगेट-खडकवासलाबरोबरच नळ स्टॉप-वारजे-माणिक बाग या टप्प्यांना पब्लिक इन्व्हेस्टमेंट बोर्डाची (पीआयबी) मान्यता मिळविण्यासंदर्भात केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केंद्रीय नगरविकास मंत्री मनोहरलाल खट्टर यांची दिल्ली येथे भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.**



### प्रस्तावित मार्ग मार्गी लावण्याचा प्रयत्न

याही प्रकल्पाला राज्य सरकारची मंजुरी मिळाली असून, पीआयबीची मान्यता प्रतीक्षेत आहे. तसेच पीआयबीच्या मान्यतेनंतर हा प्रस्ताव केंद्रीय मंत्रिमंडळात ठेवण्यात यावा, याबाबत मोहोळ यांनी खट्टर यांच्याशी चर्चा केली.मोहोळ म्हणाले, ‘शहरातील मेट्रो प्रकल्पांना गती देण्याची मोदी सरकारची भूमिका असून, नवे प्रस्तावित मार्ग लवकरात लवकर मार्गी लावण्याचा प्रयत्न आहे.

पुणे मेट्रोचे दोन्ही मार्ग पूर्ण क्षमतेने सुरू असताना वनाज ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली या मेट्रो मार्गाचे विस्तारीकरण प्रस्तावित आहे. यासाठी महामेट्रोने सविस्तर विकास आराखडा तयार केला असून, याला राज्य सरकारचीदेखील मंजुरी मिळालेली आहे. तसेच पब्लिक इनव्हेसमेंट बोर्डाचीही मान्यता ११ मार्च २०२५ रोजी मिळाली असून, आता केंद्रीय मंत्रिमंडळाची अंतिम मंजुरीची प्रतीक्षा आहे. हा प्रस्ताव लवकरात लवकर केंद्रीय मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात यावा, अशी मागणी मोहोळ यांनी खट्टर यांच्याकडे केली.तसेच, मेट्रोच्या विस्तारीकरणाचा भाग म्हणून खराडी-हडपसर-स्वारगेट-खडकवासला हा मार्गही दृष्टीक्षेपात असून, नळ स्टॉप-वारजे-माणिक बाग हा जोडमार्गही प्रस्तावित आहे. याही प्रकल्पाला राज्य सरकारची मंजुरी मिळाली असून, पीआयबीची मान्यता प्रतीक्षेत आहे. तसेच पीआयबीच्या मान्यतेनंतर हा प्रस्ताव केंद्रीय मंत्रिमंडळात ठेवण्यात यावा, याबाबत मोहोळ यांनी खट्टर यांच्याशी चर्चा केली. मोहोळ म्हणाले, ‘शहरातील मेट्रो प्रकल्पांना गती देण्याची मोदी सरकारची भूमिका असून, नवे प्रस्तावित मार्ग लवकरात लवकर मार्गी लावण्याचा प्रयत्न आहे. संपूर्ण शहरभर मेट्रोचे जाळे तयार करताना त्याला आणखी वेग यावा, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. दोन्ही विषयांबाबत खट्टर यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली असून, याबाबत लवकरच सकारात्मक निर्णय होईल हा विश्वास वाटतो.’पुणे मेट्रोचे दोन्ही मार्ग पूर्ण क्षमतेने सुरू असताना वनाज ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली या मेट्रो मार्गाचे विस्तारीकरण प्रस्तावित आहे. यासाठी महामेट्रोने सविस्तर विकास आराखडा तयार केला असून, याला राज्य सरकारचीदेखील मंजुरी मिळालेली आहे. तसेच पब्लिक इनव्हेसमेंट बोर्डाचीही मान्यता ११ मार्च २०२५ रोजी मिळाली असून, आता केंद्रीय मंत्रिमंडळाची अंतिम मंजुरीची प्रतीक्षा आहे. हा प्रस्ताव लवकरात लवकर केंद्रीय मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात यावा, मेट्रोच्या विस्तारीकरणाचा भाग म्हणून खराडी-हडपसर-स्वारगेट-खडकवासला हा मार्गही दृष्टीक्षेपात असून, नळ स्टॉप-वारजे-माणिक बाग हा जोडमार्गही प्रस्तावित आहे.

## आरटीओचे दुर्लक्ष, खासगी बसचे भाडे दामदुपट्ट

# पिंपरी चिंचवडमधील प्रवाशांची ‘सरकारमान्य’ लूट

## बसच्या मनमानी भाड्यामुळे प्रवाशांच्या खिशाला चाट

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सुट्ट्यांचा हंगाम सुरु झाला की, नागरिकांना मूळ गावी जाण्याचे किंवा नातेवाईकांना भेटण्यासाठी अथवा पर्यटनाला जाण्याचे वेध लागतात. ह्या काळात रेल्वेला असलेली गर्दी, प्रतीक्षा यादी बघता सामान्य नागरिक हा खासगी प्रवासी बसद्वारे प्रवासाला प्राधान्य देतो. मात्र ,नेमकी प्रवाश्यांची ही गरज ओळखून खासगी बस मालकांनी प्रचंड भाडेवाढ केली आहे. यातून ग्राहकांची पिळवणूक आणि लूटमार सुरू आहे.**



दरम्यान, जास्त भाडे आकारणी करणाऱ्या बसचालक, मालक आणि कंपन्यांविरुद्ध कारवाई करण्यात आरटीओ आखडता हात घेत असल्याने प्रवाशांची चक्क ‘सरकारमान्य’ लूट सुरू आहे.पिंपरी-चिंचवड ही कामगार, कष्टकऱ्यांची नगरी म्हणून ओळखली जाते. राज्याच्या तसेच परराज्यातील कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने चाकरमानी उद्योगनगरीत वास्तव्यास आहेत. दिवाळी तसेच उन्हाळ्यात मुलांना शाळेला सुटी लागत असल्याने अनेक जण कुटूंबासह गावी जाण्यास प्राधान्य देतात. शहरातून मूळगावी जाणाऱ्या प्रवाशांमध्ये विदर्भ आणि मराठवाड्यातील प्रवाशांची संख्या अधिक आहे. मुख्यत्वे दिवाळी आणि उन्हाळी सुट्टीच्या काळात ही संख्या खूप मोठी असते. उन्हाळी सुट्टीच्या पार्श्वभूमीवर रेल्वेचे बुकिंग फुल्ल झालेले आहे. एसटी महामंडळाकडेही प्रवाशांची गर्दी असते. त्यामुळे प्रवाशांना खासगी ट्रॅव्हल्स हाच पर्याय शिल्लक असतो.

मात्र, याच संधीचा खासगी प्रवासी वाहतुक करणारे गैरफायदा उठवतात. शहरातून दररोज सुमारे पाचशेहून अधिक खासगी बस राज्याच्या विविध भागात जातात. या व्यतिरिक्त मुंबईहूनही मोठ्या संख्येने खासगी बस पुण्यातून पुढे मार्गस्थ होतात. ट्रॅव्हल्स चालकांकडून या काळात मोठ्या प्रमाणात तिकीट दर वाढवले जातात. काही ठिकाणी तिकीट दरामध्ये दुप्पट, तिप्पट वाढ केली जाते. ही वाढ प्रवाशांच्या खिशाला चांगलाच चाट लावत आहे. प्रवाशांची संख्या वाढण्याच्या काळात बसचे भाडे वाढविण्याचे प्रकार होतात. त्यामुळे प्रवाशांना मोठा भुर्दंड बसत आहे. त्यामुळे सुटीच्या काळात गावी जावे की नाही असा प्रश्न सर्वसामान्यांना भेडसावत आहे. उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत खासगी प्रवासी बसची वाहतूक पथकामार्फत तपासणी करावी. तिकीट बुकिंग काउंटरवरदेखील जाऊन तपासणी व्हावी. गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जावी. भाडेवाढीमुळे प्रवाशांना विनाकारण भुर्दंड सहन करावा लागत आहे. या त्रासापासून सुटका होऊन नागरिकांची होणारी लूटमार थांबवावी, अशी मागणी प्रवाशांमधून केली जात आहे.

### सरकारच्या कमाल दराकडे दुर्लक्ष

खासगी प्रवासी बसला एसटी बसच्या प्रतिकिलोमीटर भाडेदाच्या दीडपट भाडे आकारता येते. याबाबतचे कमाल भाडे सरकारने निश्चित केले आहे. हे दीडपट दर केवळ उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत असतात. काही खासगी प्रवासी बस सणासुदीच्या व गर्दीच्या हंगामामध्ये प्रवाशांकडून मनमानी भाडे आकारतात. मात्र, जास्त भाडे आकारणाऱ्या खासगी बसवर आरटीओ आणि वाहतूक पोलिसांकडून कोणतीही कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे खासगी आराम बस चालकांच्या मनमानीत वाढ होत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बसमालकांवर आरटीओने कारवाई करणे गरजेचे आहे.

---

# बचत गटांच्या महिलांकडून मालमत्ता कर बिलांचे वाटप!

## मालमत्ताधारकांनी सहकार्य करावे : पिंपरी-चिंचवड पालिका प्रशासनाचे आवाहन

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने २०२५-२६ या आर्थिक वर्षातही महिला बचत गटाच्या मार्फत बिलांचे वाटप सुरू करण्यात आले आहे. तरी बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.**





पिंपरी-चिंचवड शहरात ६ लाख १५ हजार ८६३ नोंदणीकृत मालमत्ता आहेत. त्यानुसार सर्वच बिलांची छपाई होऊन बिले वाटप करण्यास सुरुवात झाली आहे. महिला बचत गटातील महिलांच्या माध्यमातून मिळकतकर बिले घरोघरी पोहोचवण्याची जबाबदारी महानगरपालिकेने महिला आर्थिक विकास महामंडळावर सोपवली आहे. बिल वाटप करण्यात येणाऱ्या महिलांना महानगरपालिकेच्या वतीने ओळखपत्र ही देण्यात आले आहे. ३१ मे पर्यंत सर्व बिलांचे वितरण करण्याचे नियोजन महानगरपालिकेने केले आहे. तरी नागरिकांनीही बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. मालमत्ता कर भरण्याची ऑनलाइन सुविधा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आर्थिक वर्ष २०२५-२६ ची मालमत्ता कर बिले ऑनलाइन प्रसिद्ध करण्यात आली असून, करदात्यांना त्यांच्या नावावर नोंद असलेल्या मालमत्तांची बिले www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहता व भरता येतील. तसेच मालमत्ता कर बिले ३० जूनपर्यंत ऑनलाईन पद्धतीने बिले भरल्यास सामान्य करावर १० टक्के सवलत मिळणार आहे.

> बचत गटांच्या महिलांमार्फत मालमत्ता कर बिलांचे वाटप सुरू झाले आहे. यामुळे बचत गटांच्या महिलांच्या आर्थिक सक्षमतेस बळकटी मिळणार आहे. तसेच नागरिकांपर्यंत वेळेवर बिले पोहोचवण्याच्या उद्देशालाही चालना मिळणार आहे. नागरिकांनी देखील बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे.
>
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> पिंपरी चिंचवड महानगरपालिका मालमत्ता कर विभागाचे बिल वाटप महिला बचत गटांच्या महिलांमार्फत करण्यात येत आहे. ३० जून २०२५ पर्यंत कर भरल्यास मालमत्ताधारकांना विविध सवलतींचा लाभ घेता येणार आहे. तरी जास्तीत जास्त मालमत्ताधारकांनी लवकरात लवकर कर भरून सवलतींचा लाभ घ्यावा.
>
> - प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### सर्वांचे विस्मरण करून रामच आठवावा

अकर्तेपणे करीत राहावे कर्म ।हाच परमात्मा आपलासा करून घेण्याचा मार्ग ॥ न करावा कोणाचा द्वेष मत्सर ।सर्वांत पाहावा आपला रघुवीर ॥ परनिंदा टाळावी ।स्वतःकडे दृष्टि वळवावी ॥ गुणांचे करावे संवर्धन । दोषांचे करावे उच्चाटन ॥ जेथे जेथे जावे । चटका लावूनच यावे ॥ याला उपाय एकच जाण । रघुनाथावांचून न आवड दुजी जाण ॥ देहाचे दुःख अत्यंत भारी । रामकृपेने त्याची जाणीव दूर करी ॥ मनावर कशाचाही न होऊ द्यावा परिणाम ।हे पूर्ण जाणून, की माझा त्राता राम ॥ अभिमान नसावा तिळभरी। निर्भय असावे अंतरी ॥ जे दुःख देणे आले रामाचे मनी ।ते तू सुख मानी ॥ देह टाकावा प्रारब्धावर। आपण मात्र साधनाहून नाही होऊ दूर ॥ मी असावे रामाचे । याहून जगी दुसरे न दिसावे साचे ॥ प्रपंचातील सुखदुःख ठेवावे देहाचे माथा । आपण न सोडावे रघुनाथा ॥ आपण नाही म्हणू कळले जाण । ज्ञानाचे दाखवावे अज्ञान ॥ दोष न पाहावे जगाचे । आपले आपण सुधारून घ्यावे साचे ॥ कोणास न लावावा धक्का । हाच नेम तुम्ही राखा ॥ एक रामसेवा अंतरी । सर्वांभूती भगवद्भाव धरी ॥ राम ज्याचा धनी । त्याने न व्हावे दैन्यवाणी ॥ नका मागू कुणा काही । भाव मात्र ठेवा रामापायी ॥ वाईटांतून साधावे आपले हित । हे ठेवावे मनी निश्चित ॥ भगवंताचे विस्मरण । हे वस्तूच्या मोहाला कारण॥ म्हणून भक्ति व नाम । याशिवाय ऐकू नये कोणाचे ज्ञान ॥ परिस्थितीचा निर्माता परमात्मा जाण । त्यातच त्यास पाहावे आपण ॥ सर्व कर्ता राम हा भाव ठेवता चित्ती । खऱ्या विचारांची जोडेल संगति । व्यवहारातील लाभ आणि हानि । मनापासून आपण न मानी ॥ मी आहे रामाचा ही जाणीव ठेवून मनी ॥ सुखाने वर्तत जावे जनी ॥ एकच क्षण ऐसा यावा । जेणे सर्वांचे विस्मरण करून रामच आठवावा ॥ रामाविण उठे जी जी वृत्ति । त्यासी आपण न व्हावे सांगाती ॥ मी रामाचा हे जाणून । वृत्ति ठेवावी समाधान ॥ धन्य मी झालो । रामाचा होऊन राहिलो । ही बनवावी वृत्ति । जेणे संतोषेल रघुपति ॥ वृत्ति बनविण्याचे साधन । राखावे परमात्म्याचे अनुसंधान ॥ शरीरसंपत्ति क्षीण झाली । तरी वृत्ति तशी नाही बनली ॥ विषयाधीन जरी होय वृत्ति। तरी दुरावेल तो रघुपति ॥ संतांची जेथे वस्ती ।तेथे आपली ठेवावी वृत्ति ॥ सतत विवेक अखंड चित्ती। रामनामी मनोवृत्ति ।हेचि तुम्हा परम प्राप्ति ॥ नामामध्ये ऐसी सत्ता । जेणे जोडे रघुनाथा ॥ नामापरते न मानावे हित ।हेच आजवर सांगत आलो सत्य ॥ भगवंताला आपले होणे आवडते फार ।श्रीरामनामी राहावे खबरदार ॥

**बोधवचन:- रघुनाथस्मरणात असावे आनंदात। तेथे न चाले कोणाची मात॥**



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# 'महायुती' तील मतभेदांचे दर्शन, व्हाया फडणवीस!



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नेहमी 'टू दि पॉईंट' बोलण्यासाठी प्रसिद्ध आहेत. पत्रकारांना उत्तर देताना नेमकेपणा साधतात आणि इतर पाल्हाळ टाळतात ! त्यांची जीभ तर कधीच घसरत नाही. पण, नुकतीच एका कार्यक्रमात त्यांनी आपले डावे-उजवे हात म्हणजे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबाबत जी टिप्पणी केली, त्यामुळे चर्चांना ऊत आला! या तिघांमध्ये विसंवाद किंवा मतभेद असल्याच्या वावड्या उठू लागल्या आहेत..!**

### 'महायुती' एकत्रच लढणार..

'महायुती' मध्ये वादाची ठिणगी पडल्याची स्वप्ने पाहत विरोधी आघाडीमध्ये मात्र चांगलेच आनंदाचे वातावरण आहे. स्वतः फडणवीस किंवा भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले आहे, की आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 'महायुती' मधील तीनही पक्ष एकत्रच लढवणार आहेत, पण शेवटी त्यांच्यातील मतभेद हे विरोधकांसाठी सुखद मानावे लागतील!

### शिंदे-पवार संवादासाठी अयोग्य..

फडणवीस यांनी केलेल्या एका विधानाची सध्या सगळीकडे जोरदार चर्चा आहे. एका मुलाखतीत, त्यांनी अजित पवार आणि एकनाथ शिंदे हे दोघेही संवाद साधण्यात चांगले नसल्याचे म्हटले आहे. त्यांच्या या विधानामुळे 'महायुती' सरकारमध्ये सगळे सुरळीत सुरू नाही, हे मात्र पुढे आले आहे.

### 'महायुती' चे दणदणीत पुनरागमन..

विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात प्रचंड बहुमताने 'महायुती' सरकारने पुनरागमन केले. भाजपाला ऐतिहासिक यश मिळाल्याने मुख्यमंत्रिपदी देवेंद्र फडणवीस विराजमान झाले, तर शिवसेनेचे एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार उपमुख्यमंत्री झाले. या तीन नेत्यांच्या नेतृत्वाखालील 'महायुती' सरकारमध्ये अधूनमधून वादाची ठिणगी पडत असते. मात्र, आम्ही आपआपसात संवाद साधून हे मतभेद दूर करतो, असा दावा या नेत्यांकडून वेळोवेळी केला जात असतो. अशातच एका मुलाखतीत फडणवीस यांनी आपल्या दोन उपमुख्यमंत्र्यांबाबत धाडसी विधान केले आहे. अजित पवार आणि एकनाथ शिंदे या दोघांपैकी एकही नेता संवाद साधण्यात चांगला नाही, असे फडणवीस यांनी म्हटले असून जणू बॉम्बच टाकला आहे!

### आलबेल' नसल्याचे संकेत ?

एका मुलाखतीदरम्यान फडणवीस यांना काही प्रश्न विचारण्यात आले. अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यामध्ये कोण सर्वात चांगल्या पद्धतीने संवाद ठेवतात? असा प्रश्न यावेळी विचारण्यात आला होता. त्यावर फडणवीस म्हणाले की, त्यांनी मला माफ करावे, पण दोघेही चांगले संवाद साधणारे नेते नाहीत. मुख्यमंत्र्यांनी केलेल्या या धाडसी विधानाची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा होत असून 'महायुती' त सर्व काही 'आलबेल' नसल्याचे संकेत तर फडणवीस यांनी या माध्यमातून दिले नाहीत ना, अशी चर्चा मात्र रंगू लागली आहे.

### अजित पवार की एकनाथ शिंदे?

फडणवीस यांना या मुलाखतीमधील 'रॅपिड फायर राऊंड' मध्ये अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्याशी संबंधित इतरही काही प्रश्न विचारण्यात आले. अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यात नैसर्गिक आपत्तीचे व्यवस्थापन कोणता नेता चांगल्या पद्धतीने करतो? या प्रश्नावर ते म्हणाले की, एकनाथ शिंदे यांना नैसर्गिक आपत्तीत स्वतःला झोकून देण्याची आवड आहे. त्यामुळे मी त्यांचे नाव घेईन. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत अजित पवार की एकनाथ शिंदे, कोण वरचढ आहे ? या प्रश्नावर देवेंद्र फडणवीसांनी चलाखीने उत्तर देत भाजपा वरचढ असल्याचे म्हणाले. तर पायाभूत सुविधांच्या विकासाबाबत कोणाचा दृष्टीकोन चांगला आहे? असे विचारले असता आम्हाला तिघांनाही हे काम आवडते, असे ते म्हणाले.

### एकाचा सल्ला घेणार नाही..

तुमचे तुमच्या पक्षश्रेष्ठींसोबत मतभेद झाले, तर तुम्ही या दोघांपैकी कोणाचा सल्ला घ्याल? असा प्रश्न फडणवीस यांना विचारण्यात आला होता. या प्रश्नावरही उत्तर देताना आपण अजित पवार किंवा एकनाथ शिंदे यांचा सल्ला घेणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कारण, आमच्या पक्षनेतृत्वाला मी जास्त चांगला आणि जवळून ओळखतो. त्यांना त्याबाबत फार माहिती नाही, असे ते म्हणाले.

### निधी वळविल्याचा आरोप चुकीचा..

फडणवीस म्हणाले, की लाडकी बहीण योजना ही राज्य सरकारची 'गेमचेंजर' योजना आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींना प्राधान्य दिले आहेच. पण, लाडक्या बहीण योजनेसाठी अन्य खात्यांच्या निधी वळव्याचा आरोप अतिशय चुकीचा आणि खोटा आहे. अर्थसंकल्पाची पद्धत ज्यांना कळत नाही, तेच अशाप्रकारे आरोप करतात. कारण, अर्थसंकल्पाच्या नियमानुसार वैयक्तिक लाभासाठी जो निधी दिला जातो, तो आदिवासी विभागातच दाखवावा लागेल, अनुसूचित जाती व सामाजिक न्याय विभागातच तो दाखवावा लागेल. यासंदर्भात, अजित पवार यांनीही सभागृहात खुलासा केला आहे. पण बेछूट आरोप करणारे आरोप करतच असतात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### एकनाथ शिंदे यांची शांतीत क्रांती..

दरम्यान, एकनाथ शिंदे यांची कामाची पद्धत वेगळी असून सुरू असून त्यांनी राज्यभर 'ऑपरेशन टायगर' हाती घेतले आहे. ते पक्षसंघटन बळकट करण्यावर 'फोकस' करत असून उद्धवसेनेचा तळागाळात अक्षरशः बाजार उठवत आहेत.

### ठाकरेसेनेत फक्त नवरत्ने शिल्लक..

थोडक्यात काय, येत्या काही दिवसांत उद्धव ठाकरे यांच्या पक्षात फक्त आदित्य, वरूण, परब, नार्वेकर, अंबादास, सावंत, प्रभू आणि सुनील व संजय राऊतबंधू ही नवरत्नेच शिल्लक राहणार, असे टोमणे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून मारले जात आहेत. तिकडे, अजितदादांच्या आघाडीवर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्यावर चर्चा सुरू झाल्या असाव्यात, असे ठोकताळे आहेत.

### तीनही नेते जमिनीवरील..

फडणवीस, शिंदे किंवा अजित पवार हे तीनही नेते तळागाळातील नागरिकांसाठी काम करणारे आणि जमिनीवर राहणारे नेते आहेत, त्यामुळे आपापसातील वादामध्ये ते हातची सत्ता घालवतील, असे कधीच वाटत नाही. जनतेला चर्चेला विषय मिळावा, म्हणूनच फडणवीस यांनी संवादाचा तो मुद्दा पुढे आणला असावा, हे निश्चित !

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राज्यात 'एक राज्य, एक नोंदणी' मोहीम

## चंद्रशेखर बावनकुळे यांनी कामकाजाचा आढावा घेतला

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**शिसोलापूर जिल्ह्यात नागरिकांना नोंदणी व मुद्रांक विभागाच्या वतीने जिल्ह्याच्या कोणत्याही भागातून 'एक जिल्हा, एक नोंदणी ' मोहिमेंतर्गत उपनिबंधक कार्यालयात नोंदणी करण्याची सोय झाली आहे. याच योजनेच्या अनुषंगाने पुढील काळात महायुती सरकार संपूर्ण राज्यासाठी ' एक राज्य, एक नोंदणी ' मोहीम हाती घेणार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.**



जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात आयोजित नोंदणी व मुद्रांक शुल्क तसेच भूमी अभिलेख विभागाच्या बैठकीत बावनकुळे यांनी कामकाजाचा आढावा घेतला. पंढरपूरसह दहा शहरांमध्ये केंद्र सरकारचा 'नक्षा' उपक्रम पथदर्शी प्रकल्प म्हणून राबविण्यात येणार असून, नंतर हा प्रकल्प संपूर्ण राज्यात राबविण्याचा मानस बावनकुळे यांनी बोलून दाखविला. ते म्हणाले, पंढरपूर नगरपालिका हद्दीतील सर्व घरांची भूमी अभिलेख विभागाने ड्रोनच्या साह्याने मोजणी करून मिळकत पत्रिका तयार करून ठेवाव्यात. हे काम अतिशय जबाबदारीने आणि पारदर्शकपणे करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.प्रारंभी जिल्हा भूमी अभिलेख अधीक्षक सचिन भंवर यांनी, सोलापूर स्वामीत्व योजनेअंतर्गत ड्रोनद्वारे ६४३ गावांची मोजणी पूर्ण करण्यात आल्याचे सांगितले. स्वामीत्व योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात गावठाणाबाहेरील त्यांचीही मोजणी करण्यात येणार असल्याची माहितीही बावनकुळे यांनी दिली. या बैठकीस रणजितसिंह मोहिते-पाटील, समाधान अवताडे, अभिजित पाटील, उत्तम जानकर, डॉ. बाबासाहेब देशमुख, राजू खरे, देवेंद्र कोठे या आमदारांनीसह जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निराळी, उपजिल्हाधिकारी (महसूल) संतोषकुमार देशमुख आदींची उपस्थिती होती. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात आयोजित नोंदणी व मुद्रांक शुल्क तसेच भूमी अभिलेख विभागाच्या बैठकीत बावनकुळे यांनी कामकाजाचा आढावा घेतला. पंढरपूरसह दहा शहरांमध्ये केंद्र सरकारचा 'नक्षा' उपक्रम पथदर्शी प्रकल्प म्हणून राबविण्यात येणार असून, नंतर हा प्रकल्प संपूर्ण राज्यात राबविण्याचा मानस बावनकुळे यांनी बोलून दाखविला. ते म्हणाले, पंढरपूर नगरपालिका हद्दीतील सर्व घरांची भूमी अभिलेख विभागाने ड्रोनच्या साह्याने मोजणी करून मिळकत पत्रिका तयार करून ठेवाव्यात. हे काम अतिशय जबाबदारीने आणि पारदर्शकपणे करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.प्रारंभी जिल्हा भूमी अभिलेख अधीक्षक सचिन भंवर यांनी, सोलापूर स्वामीत्व योजनेअंतर्गत ड्रोनद्वारे ६४३ गावांची मोजणी पूर्ण करण्यात आल्याचे सांगितले. स्वामीत्व योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात गावठाणाबाहेरील त्यांचीही मोजणी करण्यात येणार असल्याची माहितीही बावनकुळे यांनी दिली. या बैठकीस रणजितसिंह मोहिते-पाटील, समाधान अवताडे, अभिजित पाटील, , राजू खरे, देवेंद्र कोठे या आमदारांनीसह जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निराळी, उपजिल्हाधिकारी (महसूल) संतोषकुमार देशमुख आदींची उपस्थिती होती.

### कामकाजाचा आढावा

शिसोलापूर जिल्ह्यात नागरिकांना नोंदणी व मुद्रांक विभागाच्या वतीने जिल्ह्याच्या कोणत्याही भागातून 'एक जिल्हा, एक नोंदणी ' मोहिमेंतर्गत उपनिबंधक कार्यालयात नोंदणी करण्याची सोय झाली आहे. याच योजनेच्या अनुषंगाने पुढील काळात महायुती सरकार संपूर्ण राज्यासाठी ' एक राज्य, एक नोंदणी ' मोहीम हाती घेणार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात आयोजित नोंदणी व मुद्रांक शुल्क तसेच भूमी अभिलेख विभागाच्या बैठकीत बावनकुळे यांनी कामकाजाचा आढावा घेतला. पंढरपूरसह दहा शहरांमध्ये केंद्र सरकारचा 'नक्षा' उपक्रम पथदर्शी प्रकल्प म्हणून राबविण्यात येणार असून, नंतर हा प्रकल्प संपूर्ण राज्यात राबविण्याचा मानस बावनकुळे यांनी बोलून दाखविला.

# युवा धोरण समितीतून आमदारांना डावलले

## नांदेडच्या कार्यकर्त्यांची मुख्यमंत्र्याकडे तक्रार

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्याचे सुधारित युवा धोरण तयार करण्यासाठी क्रीडा व युवक कल्याण खात्याच्या मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीत सहा तरुण आमदारांचा समावेश आहे, पण महायुतीतील एकाही महिला आमदारास या समितीत स्थान मिळालेले नाही.**



काँग्रेस आघाडी सरकारच्या राजवटीत २०१२ साली शासनाचे युवा धोरण जाहीर झाले होते. त्यानंतर १३ वर्षांनी नवे धोरण तयार करण्याचा निर्णय झाला आहे. त्यानुसार संबंधितांचा समावेश असलेली समिती बुधवारी जाहीर झाल्यानंतर नांदेडमधील कार्यकर्ते संदीपकुमार देशमुख यांनी समितीतून महिला आमदारास डावलण्यात आल्याची तक्रार थेट मुख्यमंत्र्यांना पाठविली.वरील समितीमध्ये संतोष दानवे, राजेश पवार, आशुतोष काळे, अमोल मिटकरी, श्रीकांत भारतीय या सत्ताधारी आमदारांसह अपक्ष सत्यजीत तांबे यांचा समावेश आहे. विरोधी बाकावरील आमदारांतून कोणालाही समितीत स्थान देण्यात आलेले नाही. या मुद्यावर बारडकर यांनी संबंधित खात्याचे मंत्री दत्तात्रय भरणे यांना तत्काळ पत्रही पाठविले.समितीमध्ये क्रीडा विभागाचे अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांचे प्रतिनिधी यांच्यासह काही विभागांचे प्रतिनिधी आणि तीन युवा पुरस्कारार्थींचा समावेश आहे. या समितीने २०१२ च्या युवा धोरणाचा आढावा घेऊन सुधारित युवा धोरण तयार करावे, केंद्र शासनाच्या धोरणाशी सुसंगत व युवांसाठी सहाय्यभूत ठरतील, अशा बाबी विचारात घेऊन शिफारशी कराव्यात, धोरणात बदल करताना त्याचा वित्तीय भार किती पडेल, याचा विचार करून पुढील तीन महिन्यांत सुधारित युवा धोरणाचा मसुदा तयार करावा, असे २८ मेच्या शासन निर्णयामध्ये म्हटले आहे.काँग्रेस आघाडी सरकारच्या राजवटीत २०१२ साली शासनाचे युवा धोरण जाहीर झाले होते. त्यानंतर १३ वर्षांनी नवे धोरण तयार करण्याचा निर्णय झाला आहे.

### 13 वर्षांनी नवे धोरण तयार

त्यानुसार संबंधितांचा समावेश असलेली समिती बुधवारी जाहीर झाल्यानंतर नांदेडमधील कार्यकर्ते संदीपकुमार देशमुख यांनी समितीतून महिला आमदारास डावलण्यात आल्याची तक्रार थेट मुख्यमंत्र्यांना पाठविली.वरील समितीमध्ये संतोष दानवे, राजेश पवार, आशुतोष काळे, अमोल मिटकरी, श्रीकांत भारतीय या सत्ताधारी आमदारांसह अपक्ष सत्यजीत तांबे यांचा समावेश आहे. विरोधी बाकावरील आमदारांतून कोणालाही समितीत स्थान देण्यात आलेले नाही. या मुद्यावर बारडकर यांनी संबंधित खात्याचे मंत्री दत्तात्रय भरणे यांना तत्काळ पत्रही पाठविले.समितीमध्ये क्रीडा विभागाचे अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांचे प्रतिनिधी यांच्यासह काही विभागांचे प्रतिनिधी आणि तीन युवा पुरस्कारार्थींचा समावेश आहे. या समितीने २०१२ च्या युवा धोरणाचा आढावा घेऊन सुधारित युवा धोरण तयार करावे.

# दहशतवादाला सापासारखे ठेचून काढू

## बिहारमधील सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पाकिस्तानला इशारा

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज।

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी दहशतवादाची तुलना सापाशी केली. 'जर त्याने पुन्हा डोके वर काढले तर त्याला बिळातून बाहेर काढून ठेचले जाईल', असा इशारा त्यांनी दिला. २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील सूत्रधारांचे पाकिस्तानातील तळ भारतीय सशस्त्र दलांनी उद्ध्वस्त केल्याचा पुनरूच्चारही मोदी यांनी केला.**



बिहारच्या राजधानीपासून सुमारे १४० किमी अंतरावर असलेल्या काराकाट येथे एका सभेत संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, की 'ऑपरेशन सिंदूर' हे फक्त बाणावरील टोक आहे. दहशतवादाविरुद्धची लढाई अद्याप थांबवलेली नाही आणि ती संपलेली नाही, असेही त्यांनी या वेळी नमूद केले. गेल्या महिन्यात मधुबनी जिल्ह्यातील झालेल्या सभेची आठवण करून देताना मोदी म्हणाले, की 'पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर मी बिहारला आलो होतो. पहलगाम हल्ल्यात अनेक बहिणींनी त्यांचे पती गमावले होते. मी वचन दिले होते की गुन्हेगारांना अशी शिक्षा मिळेल, ज्याची ते स्वप्नातही कल्पना करू शकत नाहीत. आज, वचन पूर्ण केल्यानंतर मी बिहारला परतलो.'देशातील भगिनींच्या 'सिंदूर'ची ताकद पाकिस्तानसह संपूर्ण जगाने अनुभवली. दहशतवाद्यांना पाकिस्तानी लष्कराच्या आश्रयाखाली सुरक्षित वाटत असेल. परंतु आम्ही त्यांना गुडघे टेकवालयाला भाग पाडले. आम्ही पाकिस्तानची हवाई तळ आणि लष्कराची महत्त्वाची ठिकाणी उद्ध्वस्त केली. हा नवीन भारत आहे आणि त्याची ताकद सर्वांनी पाहिली,' असे मोदी म्हणाले.भागलपूर : बिहारच्या दोन दिवसीय दौऱ्यावर असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना धमकी देणाऱ्या ३५ वर्षीय तरुणाला भागलपूर जिल्ह्यातून अटक केल्याची माहिती शुक्रवारी पोलिसांनी दिली. सुलतानगंज पोलीस ठाण्याच्या हद्दीतील महेशी गावातून गुरुवारी सायंकाळी आरोपीला अटक करण्यात आली, असे एका अधिकृत निवेदनात पोलिसांनी म्हटले आहे. एका व्हॉट्सअपद्वारे सुरक्षा यंत्रणांना फोन करून आरोपीने मोदींना जिवे मारण्याची धमकी दिली होती.कानपूर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी कानपूर येथे ४७ हजार ६०० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या १५ विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. मोदी यांच्या हस्ते कानपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या चुन्नीगंज ते कानपूर सेंट्रल या नवीन भूमिगत स्थानकाचे उद्घाटन करण्यात आले. पंतप्रधान मोदी यांनी घाटमपूर येथे तीन ६६० मेगावॅट क्षमतेच्या वीज आणि पंकी येथे एका औष्णिक वीज प्रकल्पाचे उद्घाटन, तसेच पंकी वीज प्रकल्पापासून कल्याणपूरपर्यंत दोन नवीन रेल्वेपुलांचेही उद्घाटन केले. कानपूर : पंतप्रधान मोदी यांनी शुक्रवारी पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या ३१ वर्षीय शुभम द्विवेदी यांच्या कुटुंबाची चकेरी विमानतळावर भेट घेतली. 'ही भेट खूप भावनिक होती,' असे शुभमचे चुलत भाऊ सौरभ द्विवेदी म्हणाले. भेटीदरम्यान पंतप्रधानही भावुक झाले आणि त्यांनी सरकारच्या पूर्ण सहकार्याचे आश्वासन दिले, असे सौरभ यांनी पुढे सांगितले. तो कुटुंबासह पहलगाम येथे पर्यटनासाठी गेला होता. बिहारच्या राजधानीपासून सुमारे १४० किमी अंतरावर असलेल्या काराकाट येथे एका सभेत संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, की 'ऑपरेशन सिंदूर' हे फक्त बाणावरील टोक आहे. दहशतवादाविरुद्धची लढाई अद्याप थांबवलेली नाही

### पहलगाम पीडित कुटुंबीयांशी चर्चा

आणि ती संपलेली नाही, असेही त्यांनी या वेळी नमूद केले. गेल्या महिन्यात मधुबनी जिल्ह्यातील झालेल्या सभेची आठवण करून देताना मोदी म्हणाले, की 'पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर मी बिहारला आलो होतो. पहलगाम हल्ल्यात अनेक बहिणींनी त्यांचे पती गमावले होते. मी वचन दिले होते की गुन्हेगारांना अशी शिक्षा मिळेल, ज्याची ते स्वप्नातही कल्पना करू शकत नाहीत. आज, वचन पूर्ण केल्यानंतर मी बिहारला परतलो.'देशातील भगिनींच्या 'सिंदूर'ची ताकद पाकिस्तानसह संपूर्ण जगाने अनुभवली. दहशतवाद्यांना पाकिस्तानी लष्कराच्या आश्रयाखाली सुरक्षित वाटत असेल. परंतु आम्ही त्यांना गुडघे टेकवालयाला भाग पाडले.

# पूंछमधील पीडितांना लवकरच आर्थिक मदत

## गृहमंत्री अमित शहा यांची घोषणा, हल्लेग्रस्त नागरिकांशी संवाद

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज।

**पाकिस्तानने सीमेपलीकडून केलेल्या तोफांच्या माऱ्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांची केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शुक्रवारी भेट घेतली. पाकिस्तानच्या हल्ल्यात झालेले नुकसान भरून काढण्यासाठी लवकरच आर्थिक पॅकेजची घोषणा केली जाईल, असे ते म्हणाले. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर शहा यांनी जम्मू-काश्मीरला दिलेली ही पहिलीच भेट आहे.**



जम्मू भागात शहा दोन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. शहा यांचे पूंछमध्ये आगमन झाल्यानंतर त्यांनी गुरुद्वारा सिंग सभा येथे प्रथम भेट दिली. पाकिस्तानी तोफांच्या माऱ्यात या धार्मिक स्थळाचे नुकसान झाले होते. याखेरीज नुकसान झालेल्या इतर भागांनाही शहा यांनी भेट दिली आणि लोकांशी संवाद साधला. शहा यांनी या वेळी पाकिस्तानच्या तोफांच्या माऱ्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. शहा यांच्याबरोबर नायब राज्यपाल मनोज सिन्हा आणि दिल्लीचे मंत्री मजिंदर सिंह सिरसा उपस्थित होते. गृहमंत्री शहा यांनी पाकिस्तानच्या आक्रमकतेला सडेतोड प्रत्युत्तर दिल्याबद्दल सीमा सुरक्षा दलाचे (बीएसएफ) कौतुक केले. जम्मू आघाडीवर पाकिस्तानच्या ११८ हून अधिक चौक्या उद्ध्वस्त झाल्याचे ते म्हणाले. 'बीएसएफ'ने शत्रूच्या टेहळणीचे जाळे नष्ट केले. शत्रूचे असे नुकसान केले, की त्यांना परिस्थिती पूर्ववत करण्यासाठी चार ते पाच वर्षांचा कालावधी लागेल. शांततेच्या काळातही तुम्ही जागरुक असता. प्रत्युत्तराने हे सिद्ध झाले, असे ते म्हणाले. स्वातंत्र्यानंतर पूंछ भागात इतक्या मोठ्या प्रमाणावर तोफांचा मारा प्रथमच झाला. पाकिस्तानने नागरी वस्त्या, मंदिरे, गुरुद्वारा, मशिदींना लक्ष्य केले. हे कृत्य अतिशय निषेधार्ह आहे. पाकिस्तानच्या या माऱ्यानंतरच आपल्या सुरक्षा दलांनी अतिशय तीव्रतेने आणि अचूकपणे उत्तर दिले. जम्मू भागात शहा दोन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. शहा यांचे पूंछमध्ये आगमन झाल्यानंतर त्यांनी गुरुद्वारा सिंग सभा येथे प्रथम भेट दिली.

### 'बीएसएफ'चे कौतुक

पाकिस्तानी तोफांच्या माऱ्यात या धार्मिक स्थळाचे नुकसान झाले होते. याखेरीज नुकसान झालेल्या इतर भागांनाही शहा यांनी भेट दिली आणि लोकांशी संवाद साधला. शहा यांनी या वेळी पाकिस्तानच्या तोफांच्या माऱ्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. शहा यांच्याबरोबर नायब राज्यपाल मनोज सिन्हा आणि दिल्लीचे मंत्री मजिंदर सिंह सिरसा उपस्थित होते.गृहमंत्री शहा यांनी पाकिस्तानच्या आक्रमकतेला सडेतोड प्रत्युत्तर दिल्याबद्दल सीमा सुरक्षा दलाचे (बीएसएफ) कौतुक केले. जम्मू आघाडीवर पाकिस्तानच्या ११८ हून अधिक चौक्या उद्ध्वस्त झाल्याचे ते म्हणाले. 'बीएसएफ'ने शत्रूच्या टेहळणीचे जाळे नष्ट केले.



# भावाच्या वाढदिवशी अपूर्वाची डोळ्यात पाणी!

अभिनेत्री अपूर्वा नेमळेकर ही नेहमी आपल्या अभिनयाने आणि बिनधास्त स्वभावामुळे चर्चेत असते. 'शेवंता' या भुमिकेपासून ओळखली जाणारी अपूर्वा ही बिग बॉस मराठी नंतर अधिकच प्रसिद्ध झाली. आता अपुर्वा 'प्रेमाची गोष्ट' या मालिकेत झळकत आहे. अपूर्वा नेमळेकर ही सोशल मीडियावर कायमच सक्रीय असते. काही महिन्यापुर्वी तिच्या सख्ख्या धाकट्या भावाचे अचानक निधन झाले. 15 एप्रिल रोजी अपूर्वाच्या लहान भावाचे ओंकार नेमळेकरचे हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले होते. आज ओंकारचा वाढदिवस आहे. लाडक्या भावाच्या वाढदिवसाला तो आपल्यात नसण्याचं दुःख अपुर्वाने एका पोस्टद्वारे मांडलं आहे. अपूर्वाने भावाच्या वाढदिवसानिमित्त सोशल मीडियावर भावाचे फोटो शेयर करत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. या पोस्टमध्ये अपुर्वा लिहिते की, दरवर्षी ७ ऑक्टोबर हा दिवस खूप मजेशीर आणि उत्साहाने भरलेला असायचा. आपल्या बालपणात या दिवशी घरी बनवणाऱ्या केकची तयारी, सजावट आणि वाढदिवसाच्या कपडे अशा अनेक गोष्टी असायच्या !!! आणि जसजसे आम्ही मोठे झालो, तसतसे आवडत्या रेस्टॉरंटमध्ये जाऊन आणि आपल्या आवडत्या स्वादिष्ट पदार्थांवर ताव मारणे हे सर्व होतं...त्यावेळी खूप मजा यायची !! आपण आपल्या आठवणी साठवत आहोत हे कधीच कळलं नाही... पण देव तूला खूप लवकर घेऊन गेला आणि तुझ्याशिवाय आमचं आयुष्य अपूर्ण आहे. मला आशा आहे की तू स्वर्गातून आमच्याकडे हसतमुखाने पहात असशील कारण आज आम्ही तूझी आठवण नेहमीपेक्षा जास्त जपत आहोत. माझ्या लाडक्या ओम तुझी आठवण काढणं खुप सोपं आहे, मी ते दररोज करतो. ही फक्त तुला गमावण्याची वेदना आहे जी कधीही दूर होत नाही. माझ्या प्रिय भाऊ, तुला वाढदिवसाच्या शुभेच्छा. भविष्यात एक दिवस तू आणि मी पुन्हा एकत्र येऊ. आम्हाला तुमची खूप आठवण येते. मी तुझ्यावर प्रेम करतो माझ्या भावा" अशा शब्दात अपूर्वाने आपल्या लाडक्या भावाला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.सध्या तिची पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे.

## लव्ह लाईफबाबत बोलला सूरज पांचोली

अभिनेता सूरज पांचोली अलिकडेच लव्ह लाईफबद्दल बोलला. समजून घेणाऱ्या व्यक्तीसोबत राहून मला खूप आनंद होत असल्याचे अभिनेत्याने सांगितले. सूरजने सांगितले की, त्याच्या सध्याच्या मैत्रिणीने त्याला जिया खान प्रकरणाबद्दल कधीही विचारले नाही. सूरजने नुकतेच त्याच्या नात्याबद्दल आणि गर्लफ्रेंडबद्दल मोकळेपणाने सांगितले. मात्र, त्याने लेडी लव्हचे नाव उघड केले नाही. सिद्धार्थ काननला दिलेल्या मुलाखतीत सूरजने सांगितले की, जिया खान प्रकरणातील मीडिया ट्रायलमुळे त्याला अडचणींचा सामना करावा लागला. तर जियासोबतचे त्याचे नाते सर्वात कमी काळ टिकले. संवादादरम्यान सूरजला तुनिषा शर्मा आत्महत्या प्रकरणाबद्दल विचारण्यात आले. या प्रकरणात अभिनेत्रीचा प्रियकर शीझान खानला तिच्या मृत्यूप्रकरणी आरोपी मानले जात होते. या प्रकरणाबाबत बोलताना सूरज म्हणाले-'मीडिया ट्रायल लोकांवरील आरोप ठरवू शकत नाही.' प्रेमाबाबत सूरज म्हणाला- मला असे वाटत नाही, माझा प्रेमावर विश्वास आहे. त्या प्रकरणानंतरही मी प्रेमात पडलो (जिया खान प्रकरण). सूरजला पुढे विचारण्यात आले की तो गेल्या सात वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये आहे का? आणि त्याच्या गर्लफ्रेंडचा त्याच्यावर किती विश्वास आहे. यावर तो म्हणाला- इतके दिवस नाही, पण मी सध्या रिलेशनशिपमध्ये आहे. आम्ही भूतकाळाबद्दल कधीही बोललो नाही. कदाचित त्याची गरजही नसेल.

## आताच सुधरा नाहीतर...!



महादेव ॲप हे प्रकरण सध्या देशभरात चांगलंच चर्चेत आलं आहे. या प्रकरणामुळे मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध कलाकारदेखील ईडीच्या रडारवर आहेत. ज्यात रणबीर कपूर, कपिल शर्मा, हुमा कुरेशी आणि हिना खान, अमिषा पटेल, श्रद्धा कपूर, सोनाक्षी सिन्हा, इम्रान हाश्मी, बोमन इराणी, कॉमेडियन भारती सिंग आणि नेहा कक्कर यांचा समावेश आहे. ईडीच्या म्हणण्यानुसार या स्टार्सनी या ॲप्सची जाहिरात केली आहे. त्यांच्या प्रमोशनल इव्हेंटमध्येही या कालाकारांचा सहभाग होता. त्यामुळे आता ईडी त्यांची चौकशी करणार आहे. त्यातच आता बॉलिवूडची पंगा क्विन कंगना राणौतचं वक्तव्य चर्चेत आलं आहे. महादेव बेटिंग ॲपच्या प्रमोशनसाठी तिला करोडो रुपयांची ऑफर देण्यात आली होती मात्र कंगनाने ती ऑफर आणि या ॲपची जाहिरात करण्यास नकार दिल्याचा खुलासा केला. इतकच नाही तर आता कंगना रणौतने महादेव ॲप प्रकरणात सहभागी असलेल्या सेलिब्रिटींवरही निशाणा साधला आहे. कंगना रणौतने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीजवर याबाबच एक पोस्ट शेयर केली आहे. एका बातमीचा स्क्रीनशॉट शेअर करत कंगना लिहिते की, "हे एंडोर्समेंट मला एका वर्षात जवळपास 6 वेळा आलं, प्रत्येक वेळी मला खरेदी करण्यासाठीच्या या ऑफरमध्ये अनेक कोटी रुपये जोडले पण मी प्रत्येक वेळी नाही म्हणाले. हा नवा भारत आहे, स्वतःला सुधरवा नाहीतर तुम्हाला वठणीवर आणण्यात येईल." महादेव ॲपमध्ये पोकर, चान्स गेम्स, बॅडमिंटन, टेनिस, फुटबॉल, क्रिकेट आणि कार्ड गेम यांसारख्या अनेक ऑनलाइन गेमवर बेटिंग केली जाते. हे ॲप दुबईचे सौरभ चंद्राकर आणि रवी उरपल चालवत होते. या वर्षी फेब्रुवारीमध्ये महादेव ॲप प्रकरणातील मुख्य आरोपी सौरभ चंद्राकरच्या विवाह सोहळ्यात अनेक कलाकारांनी सहभाग घेतला होता. आता या कलाकारांची चौकशी करण्यात येणार आहे. त्यातच आता कंगना रणौतने महादेव ॲप प्रकरणात सहभागी असलेल्या सेलिब्रिटींवर निशाणा साधला आहे.

## अभिनेत्री परिणीती चोप्राचे जंगी स्वागत

परिणिती चोप्राच्या लग्नानंतरचा एक व्हिडिओ समोर आला आहे. हा व्हिडीओ तिच्या गृहप्रवेशाचा आहे. चड्ढा कुटुंबाने परिणितीचे मनापासून स्वागत केले आहे. सासरची ही स्टाइल तिला खूप आवडली, त्याचा आनंद तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. 24 सप्टेंबर 2023 रोजी परिणितीने खासदार राघव चड्ढासोबत लग्न केले. त्यांचा विवाह उदयपूरच्या हॉटेल लीला पॅलेसमध्ये झाला. लग्नानंतर दुसऱ्याच दिवशी परिणितीने लग्नाचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले. परिणितीच्या स्वागतासाठी चड्ढा हाऊस फुलांनी आणि दिव्यांनी सजवण्यात आले होते. आरती ओवाळत सासूने त्यांचे स्वागत केले. यादरम्यान कुटुंबीयांनी परिणीती आणि राघव यांना त्यांच्या नात्याबाबत काही प्रश्न विचारले. परिणितीने सांगितले की, तिनेच आधी राघवला प्रपोज केले होते व्हिडिओमध्ये परिणितीचे लग्नानंतरचे सर्व विधी पार पाडल्याचे दिसत आहे. राघवने विधीमध्ये रिंग शोधली. परिणितीचे सासरच्यांसोबतचे सुंदर नातेही पाहायला मिळाले. व्हिडिओच्या शेवटी राघवने सांगितले की, आता परिणीती चड्ढा झाली आहे. तर परिणितीने तिचे सासरचे कुटुंब जगातील सर्वात प्रेमळ कुटुंब असल्याचे वर्णन केले. ती म्हणाली की इथले लोक तिला राणीसारखे वागवत आहेत.



## मराठी अभिनेता हृषिकेश शेलारची पत्नी काय म्हणाली?

अभिनेता हृषिकेश शेलार याने खलनायक व नायक अशा दोन्ही रुपांतून प्रेक्षकांचे भरभरुन मनोरंजन केले. विशेष बाब म्हणजे त्याच्या दोन्ही भूमिकांना प्रेक्षकांचे मोठे प्रेमही मिळाले. हृषिकेश शेलार 'सुंदरा मनामध्ये भरली' या मालिकेत खलनायकाच्या भूमिकेत दिसला होता. या मालिकेत त्याने साकारलेली दौलत ही भूमिका प्रेक्षकांच्या पसंतीस पडली. त्यानंतर तो झी मराठी वाहिनीवरील 'तुला शिकवीन चांगलाच धडा' या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला आला. या मालिकेत तो प्रमुख भूमिकेत दिसला. नायक म्हणून त्याची ही पहिली मालिका होती.'तुला शिकवीन चांगलाच धडा' या मालिकेत त्याने अधिपती ही भूमिका साकारली होती. या भूमिकेतून घराघरांत पोहोचला. आईवरचे प्रचंड प्रेम व विश्वास, पत्नीप्रतिचे समर्पण, वडिलांविषयी मनात असलेली कटुता आणि अन्यायाप्रति असलेली चीड अशी ही अधिपतीची भूमिका लोकांना प्रचंड आवडली. मास्तरीणबाई व अधिपती यांच्या केमिस्ट्रीने प्रेक्षकांच्या मनात एक वेगळी जागा निर्माण केली. या मालिकेने नुकताच निरोप घेतला आहे. आता अभिनेता त्याच्या व्यावसायिक आयुष्यामुळे नाही तर त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आला आहे. अभिनेत्याला लग्नाला आज ८ वर्षे पूर्ण झाले आहे. या निमित्ताने त्याने व त्याच्या पत्नीने त्यांचे काही खास फोटो सोशल मीडियावर पोस्ट केले आहे. या फोटोंमध्ये त्यांचे वेगवेगळ्यावेगवेगळे, त्यांच्या चेहऱ्यावर आनंद असलेले फोटो पाहायला मिळत आहेत.

# सर्व गोष्टी बाजूला ठेवून मैदानात उतरतो

## रोहित शर्माचं मुंबईच्या विजयानंतर मोठं वक्तव्य

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**मुंबई इंडियन्सने एलिमिनेटर सामन्यात गुजरात टायटन्सवर २० धावांनी दणदणीत विजय मिळवला. या विजयासह मुंबईचा संघ प्लेऑफच्या दुसऱ्या क्वालिफायरमध्ये पोहोचला आहे. रोहित शर्मा आणि जसप्रीत बुमराह मुंबईच्या या विजयाचे शिल्पकार ठरले. रोहित शर्माने ८० धावांची वादळी खेळी करत मुंबईच्या विजयाचा पाया रचला. तर बुमराहने आपल्या गोलंदाजीने सामना फिरवला.**



रोहित शर्माला एलिमिनेटरमध्ये सूर गवसला आणि त्याने गुजरातच्या गोलंदाजांची धुलाई करत ५० चेंडूत ९ चौकार आणि ४ षटकारांसह ८० धावांची खेळी केली. रोहित शर्माचं शतक हुकलं असलं तरी त्याने संघाला एका मजबूत स्थितीत नेण्यात मोठी भूमिका बजावली. रोहित शर्माला या सामन्यात सुरुवातीच्या षटकांमध्ये दोन वेळा जीवनदान मिळालं. याचा रोहितने चांगला फायदा उचलत मोठी खेळी केली.रोहित शर्माच्या मॅचविनिंग ८० धावांच्या खेळीसाठी त्याला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. रोहित शर्मा पुरस्कार मिळाल्यानंतर त्याला हर्षा भोगले यांनी विचारलं की, तू जेव्हा जेव्हा अर्धशतक केलं आहेस तेव्हा संघ जिंकला आहे, यावर रोहित म्हणाला, "मी चार अर्धशतकंच केली आहेत. पण मला अजून अशा अर्धशतकी खेळी करायला आवडतील. एलिमिनेटर सामन्यात अशी खेळी खेळण्याचं महत्त्व मला माहितीये आणि अशा फॉर्ममधून येत ही खेळी खेळणं, महत्त्वाचं होतं."पुढे रोहित शर्मा म्हणाला, "सांघिक कामगिरी पाहून मला खूप अभिमान वाटतोय. मी जेव्हा सामना खेळण्यासाठी उतरतो, तेव्हा इतर सर्व गोष्टी मी बाजूला ठेवतो.

संघासाठी कशी चांगली कामगिरी करू शकतो यावर माझा फोकस असतो."रोहित झेल सोडल्यानंतरच्या खेळीबाबत म्हणाला,"मला नशीबाने जी साथ दिली होती, त्याचा मला पुरेपूर फायदा करून घ्यायचा होता. मला आनंद आहे की मी ते करू शकलो. संघाला एका चांगल्या स्थितीत नेऊ शकलो. दव पडल्याने पुढे स्थिती आव्हानात्मक होणार, याची कल्पना होती. गोलंदाजांनी चांगली कामगिरी केली."रोहित दोनदा बाद होण्यापासून वाचल्याबाबत सांगताना म्हणाला, "खरं सांगायचं तर, मी स्पर्धेत यापूर्वीही असे शॉट्स खेळलो आहेत आणि क्षेत्ररक्षकांनी मला झेलबाद केलं आहे. एक दिवस असा असतो जिथे भाग्य तुमच्यासोबत असतो आणि माझ्यासाठी आजचा दिवस तो होता. मी भाग्यवान होतो कारण ते झेल सोडले गेले. पण त्यानंतरही तुम्हाला खेळायचं असत. माझं लक्ष्य मोमेंटम आणि तो टेम्पो कायम राखण्यावर होतं", असे रोहितने सामनावीराचा पुरस्कार जिंकल्यानंतर सांगितलं.जॉनी बेयरस्टोबाबत रोहित म्हणाला, "जॉनी त्याला मी विरूद्ध संघांकडून खेळताना इतकी वर्ष पाहिलं आहे. तो किती क्वालिटी खेळाडू हे आपल्याला माहितीये. या फॉरमॅटमध्ये खेळण्याचा त्याला मोठा अनुभव आहे. त्याची खेळी पाहून तो पहिलाच सामना खेळतोय असं वाटलं नाही. आम्हाला चांगली सुरूवात मिळाली आणि त्याचं आम्ही मोठ्या खेळीत रुपांतर केलं."मुंबई इंडियन्स आता दुसरा क्वालिफायर सामना १ जून रोजी पंजाब किंग्सविरूद्ध खेळणार आहे. हा सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवला जाईल.रोहित शर्माला हित शर्माचं शतक हुकलं असलं तरी त्याने संघाला एका मजबूत स्थितीत नेण्यात मोठी भूमिका बजावली. रोहित शर्माला या सामन्यात सुरुवातीच्या षटकांमध्ये दोन वेळा जीवनदान मिळालं.

### मी चार अर्धशतकंच केली आहेत

रोहित शर्माला एलिमिनेटरमध्ये सूर गवसला आणि त्याने गुजरातच्या गोलंदाजांची धुलाई करत ५० चेंडूत ९ चौकार आणि ४ षटकारांसह ८० धावांची खेळी केली. रोहित शर्माचं शतक हुकलं असलं तरी त्याने संघाला एका मजबूत स्थितीत नेण्यात मोठी भूमिका बजावली. रोहित शर्माला या सामन्यात सुरुवातीच्या षटकांमध्ये दोन वेळा जीवनदान मिळालं. याचा रोहितने चांगला फायदा उचलत मोठी खेळी केली.रोहित शर्माच्या मॅचविनिंग ८० धावांच्या खेळीसाठी त्याला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. रोहित शर्मा पुरस्कार मिळाल्यानंतर त्याला हर्षा भोगले यांनी विचारलं की, तू जेव्हा जेव्हा अर्धशतक केलं आहेस तेव्हा संघ जिंकला आहे, यावर रोहित म्हणाला, "मी चार अर्धशतकंच केली आहेत. पण मला अजून अशा अर्धशतकी खेळी करायला आवडतील. एलिमिनेटर सामन्यात अशी खेळी खेळण्याचं महत्त्व मला माहितीये आणि अशा फॉर्ममधून येत ही खेळी खेळणं, महत्त्वाचं होतं."पुढे रोहित शर्मा म्हणाला.

# मुंबईचं सहाव्या ट्रॉफीच्या दिशेनं पाऊल!

## बुमराहचा एक बॉल ठरला मुंबईच्या विजयाचा टर्निंग पॉईंट

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**मुंबई इंडियन्सने एलिमिनेटर सामन्यात गुजरात टायटन्सवर शानदार विजय मिळवला आहे. मुंबईने गुजरातवर २० धावांनी विजय मिळवत मुंबईने यंदाच्या प्लेऑफमध्ये क्वालिफायर -२ मध्ये धडक मारली आहे. मुंबई इंडियन्सच्या गोलंदाज-फलंदाजांनी या सामन्यात योगदान दिलं. पण जगातील उत्कृष्ट वेगवान गोलंदाज असलेल्या जसप्रीत बुमराहच्या एका यॉर्करने सामन्याचा रोख बदलला.**

बुमराहच्या त्या षटकातील एक चेंडू सामन्याचा टर्निंग पॉईंट ठरला. मुंबईच्या संघाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यासह रोहित शर्मा आणि जॉनी बेयरस्टो यांनी अर्धशतकी भागीदारी रचत मुंबईच्या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. जॉनी बेयरस्टो ४७ धावा करत बाद झाला. तर रोहित शर्माने ५० चेंडूत ९ चौकार आणि ४ षटकारांसह ८० धावांची खेळी केली. याशिवाय मुंबईच्या इतर सर्व फलंदाजांनीही यामध्ये धावांचं योगदान देत संघाला २२८ धावांचा टप्पा गाठून दिला.प्रत्युत्तरात गुजरात टायटन्सकडून साई सुदर्शन आणि शुबमन गिलची जोडी उतरली. ट्रेंट बोल्टने पहिल्याच षटकात गिलला पायचीत करत माघारी धाडलं. पण यानंतर कुसल मेंडिस



आणि साई सुदर्शनने मुंबईच्या गोलंदाजांची धुलाई करत झटपट धावा करायला सुरुवात केली. मेंडिस २० धावा करत हिट विकेटवर बाद झाला. यानंतर साई सुदर्शन आणि वॉशिंग्टन सुंदरच्या जोडीने गोलंदाजांवर हल्ला बोल केला.दोघे खेळाडू १० ते ११ च्या रनरेटने खोऱ्याने धावा करत होते. प्रत्येक गोलंदाजाविरूद्ध आक्रमक पवित्र्याने फटकेबाजी करत होते. साई सुदर्शन ७९ धावा तर वॉशिंग्टन ४८ धावांवर खेळत होता आणि मुंबई इंडियन्सच्या धावांच्या बरोबरी सामना सुरू होता. तितक्यात जसप्रीत बुमराह १४ वे षटक टाकण्यासाठी आला. बुमराहचे षटक म्हणजे विकेटची हमी हे जणू समीकरणचं झालं आहे. बुमराहने पहिल्या दोन चेंडूवर १-१ धाव दिली. तिसरा चेंडू यॉर्कर टाकत साईने एक धाव घेत सुंदरला स्ट्राईक दिली. बुमराहने पुन्हा चौथ्या चेंडूवर असा परफेक्ट यॉर्कर टाकला की, सुंदर चकित झाला आणि चेंडू मारायला जाण्याच्या नादात त्याच्या दोन्ही पायांच्या मधून चेंडू जाऊन थेट स्टम्पवर आदळला आणि सुंदरही जमिनीवर कोसळला. बुमराहच्या या यॉर्करने सामन्याचा रोख बदलला. त्या षटकात त्याने विकेट घेत फक्त ४ धावा दिल्या आणि गुजरातच्या धावांना ब्रेक लावला.जसप्रीत बुमराहने विकेट घेतल्यानंतर गुजरातच्या धावांना थोडा ब्रेक लागला. अश्वनी कुमारने पुढचं शानदार षटक टाकत तो दबाव कायम ठेवण्याचा प्रयत्न केला.

### टायटन्सवर शानदार विजय

यानंतर १६व्या षटकात पदार्पणवीर रिचर्ड ग्लीसनने साई सुदर्शनला क्लीन बोल्ड करत मुंबईच्या विजयामध्ये मोठं योगदान दिलं. यानंतर अखेरच्या षटकांमध्ये मुंबईने चांगली गोलंदाजी करत अखेरीस सामना २० धावांनी जिंकला.मुंबई इंडियन्सने एलिमिनेटर सामन्यात गुजरात टायटन्सवर शानदार विजय मिळवला आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

। शनिवार ।

। दि. 31 मे 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# राष्ट्रवादीतर्फे गाथा सन्मानाची-कर्तृत्ववान महिलांचा गुणगौरव!

## जागतिक महिला दिनानिमित्त शहराध्यक्ष प्रा. कविता आल्हाट यांचा पुढाकार



। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन राष्ट्रवादी महिला काँग्रेस पिंपरी चिंचवड शहर अध्यक्षा प्रा कविता आल्हाट यांच्या वतीने “गाथा सन्मानाची” या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये आपले अमूल्य योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा यावेळी गौरव करण्यात आला.**

सदर सन्मान सोहळा गोदावरी आंगण, बोऱ्हाडे वाडी, मोशी येथे पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष प्रा. कविता आल्हाट यांनी केले. या कार्यक्रमात महिला सक्षमीकरणाला चालना देणाऱ्या आणि समाजहितासाठी कार्य करणाऱ्या महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला. विविध क्षेत्रांमध्ये आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या, विशेषतः परिचारिका, शिक्षिका, ब्युटीशियन, पोलीस कॉन्स्टेबल, तसेच इतर विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या महिलांना शहर अध्यक्ष कविता आल्हाट यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.महिलांसाठी विविध खेळांचे, कलागुणांचे प्रदर्शन चे आयोजन करण्यात आले होते.

### महिलांना प्रेरणा देण्याचा प्रयत्न...

राष्ट्रवादी काँग्रेस महिला सेलच्या प्रदेश अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदद पवार, प्रदेश अध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेसच्या “गाथा सन्मानाची” या उपक्रमाद्वारे महिलांना प्रेरणा देण्याचा आणि त्यांच्या मेहनतीचे कौतुक करण्याचा स्तुत्य प्रयत्न करण्यात आला.

---

## ‘निर्भय कन्या’ अभियानामधून

# महिला सक्षमीकरणाचा नवा अध्याय - डॉ. किर्ती धारवाडकर

## शिक्षण विश्व: एसबीपीआयएम मध्ये निर्भय कन्या अभियान संपन्न

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**विद्यार्थिनींचा आणि समाजातील वंचित घटकांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी निर्भय कन्या अभियान मोठ्या प्रमाणात राबविण्यात आले पाहिजे. यामुळे महिलांचे मनोबल आणि आत्मविश्वास वाढेल. त्यातून त्यांचे व्यक्तिमत्व विकसित होऊन त्या सक्षम नागरिक म्हणून काम करतील, हाच निर्भय कन्या अभियानाचा मुख्य उद्देश आहे असे एसबीपीआयएमच्या संचालिका डॉ. किर्ती धारवाडकर यांनी सांगितले.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने एसबीपीआयएम येथे “निर्भय कन्या अभियान” कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी वरिष्ठ संबंध व्यवस्थापक दिपाली महाजन, सह प्रा.डॉ.काजल माहेश्वरी, डॉ.रूपाली कुदरे आदी उपस्थित होते.

पहिल्या सत्रात ‘इंट्रोडक्शन टू द वर्ल्ड ऑफ इन्व्हेस्टमेंट- एक गुंतवणूकदार जागरूकता उपक्रम’ या विषयावर दिपाली महाजन यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, व्यवस्थापक, व्यवस्थापकीय बँकिंग आणि राष्ट्रीय वितरण वाहिनीचा अवलंब करून विद्यार्थिनींना जीवनात स्वतंत्रता, वेळेची बचत आणि गुंतवणूक करून करिअर मध्ये स्थिरता कशी आणता येते. विद्यार्थ्यांना पैशांचे व्यवस्थापन आणि विविध आर्थिक साधनांमधील गुंतवणुकीचे महत्त्व सांगितले.

दुसऱ्या सत्रात डॉ. काजल माहेश्वरी यांनी ‘वैयक्तिक सुरक्षा’ या विषयावर मार्गदर्शन केले. वैयक्तिक सुरक्षा वाढविण्यासाठी लागणारी धोरणे, स्व-संरक्षण तंत्र आणि संभाव्य धोक्यांची जाणीव विद्यार्थिनींना करून दिली. कोणत्याही परिस्थितींमध्ये सुरक्षित राहण्यासाठी काळजी कशी घ्यावी याची उदाहरणे दिली.

समारोप प्रसंगी डॉ. रूपाली कुदरे यांनी ‘मानसिक आरोग्य व्यवस्थापन’ या विषयावर मानसिक आरोग्य व्यवस्थापनाचे महत्त्व, तणाव व्यवस्थापन तंत्र, जागरूकता, सकारात्मक विचार, स्वत:ची काळजी घेण्याच्या धोरणांवर मार्गदर्शन केले. मानसिक आरोग्याच्या आव्हानांना ओळखण्याच्या आणि त्यांचा सामना करण्याच्या पद्धती समजून सांगितल्या. प्रश्नोत्तराच्या सत्रात विद्यार्थ्यांनी वक्त्यांना गुंतवणूक धोरणे,वैयक्तिक सुरक्षा उपाय आणि मानसिक आरोग्य व्यवस्थापनाशी संबंधित विविध प्रश्न विचारले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी उत्कृष्ट कार्यक्रम राबविल्याबद्दल आयोजकांचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.


मोरया शिक्षण संस्था
Computer Vacation Batch
ADMISSIONS OPEN
2025-26
'C' भाषा ₹ १३००/-
'C++' भाषा ₹ १३००/-
बेसिक जावा ₹ १३००/-
स्क्रॅच ॲनिमेशन ₹ १३००/-
बेसिक टॅली ₹ १५००/-
एम.एस. ऑफिस ₹ १५००/-
कोरल ड्रॉ ₹ ११००/-
Adobe AB फोटोशॉप ₹ ११००/-
सर्व कोर्स 20 मार्च 2025 पासून सुरू होत आहेत. इच्छुक पालक, विद्यार्थी व इतर शाळेतील विद्यार्थ्यांनी खालील नंबरवर संपर्क करून प्रवेश निश्चित करावा. अथवा शाळेतील संगणक कक्षात येऊन अधिक माहिती घ्यावी.
ठिकाण: संगणक लॅब, व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड. संपर्क : 8087706100

# रंग आणि लेखणीतून जगभरातील घडामोडींवर भाष्य!

## शिक्षण विश्व: पिंपरी चिंचवड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या अंतर महाविद्यालयीन स्पर्धेला प्रतिसाद

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पोस्टर मेकिंग, निबंध लेखन आणि वक्तृत्व स्पर्धा मधून विद्यार्थ्यांनी सद्यस्थितीवर भाष्य केले. जगभरातील विविध घडामोडी विद्यार्थ्यांनी रंग आणि लेखणीतून व्यक्त केल्या. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळवून दिल्याबद्दल विद्यार्थी आणि पालकांकडून या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करण्यात आले .**




पिंपरी चिंचवड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, रावेत आणि भारतीय रेड क्रॉस सोसायटी, पुणे जिल्हा शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन पोस्टर मेकिंग, निबंध लेखन आणि वक्तृत्व स्पर्धांचा बक्षी वितरण समारंभ नुकताच संपन्न झाला. या स्पर्धेत पुणे व पिंपरी चिंचवड मधील विविध महाविद्यालयांतील ११० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता.

पारितोषिक वितरण समारंभाला उपस्थित पाहुणे डॉ. आबासाहेब शिंदे, प्राचार्य डॉ. स्मृती पाठक, कार्यक्रम समन्वयक प्रा. देवेंद्र देसाई, प्रा. सुप्रिया कुलकर्णी आणि एस. बी. पाटील सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, रावेतचे प्राचार्य संदीप पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

पोस्टर स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून सुवर्णा शिंदे, अश्विनी साळवे, निबंध लेखन स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. शेळके, प्रा. अमृता दीक्षित आणि वकृत्व स्पर्धेसाठी प्रा. स्वाती पाटील, प्रा. रोहित वरवंडकर यांनी काम पाहिले. प्रास्ताविक प्रा. इशप्रीत कौर, सूत्रसंचालन प्रा. देवेंद्र देसाई व आभार प्रा. सुषमा पिंपळखरे यांनी मानले.

विजेत्यां विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह, रोख बक्षीसे व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि भारतीय रेड क्रॉस सोसायटी, पुणे जिल्हा शाखेचे सहकार्य मिळाले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

2025–26
ADMISSIONS
OPEN

PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI

42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

50 FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now
86687 55826
98232 31705

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105



# पीएचडी मार्गदर्शकांकडून होताहेत गैरव्यवहार!

## आमदार शंकर जगताप: विधानसभेत राज्य सरकारचे लक्ष वेधले!

| पिंपरी | प्रतिनिधी : महाईन्यूज |

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पीएचडी मार्गदर्शक आणि सांगवी येथील बाबुराव घोलप महाविद्यालयातील अर्थशास्त्राच्या प्राध्यापिकेने पीएचडी विद्यार्थ्यांकडून लाच घेतल्याच्या प्रकरणावर विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात चर्चा झाली. आमदार शंकर जगताप यांनी या संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांना प्रश्न विचारले. पीएचडी मार्गदर्शकांकडून होणारे गैरव्यवहार रोखण्यासाठी कठोर उयोयजना करावी, अशी आग्रही मागणी आमदार जगताप यांनी केली.**



आमदार शंकर जगताप यांनी विचारलेल्या प्रश्नांमध्ये संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेसह, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील नियंत्रण, विद्यार्थ्यांची गैरसोय, आणि पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर सरकारने कोणती पावले उचलली आहेत, या महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश होता.

या प्रश्नांना उत्तर देताना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेची घटना खरी असल्याचे मान्य केले. मात्र, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवर नियंत्रण नसल्याने विद्यार्थ्यांची छळवणूक होते, हा आरोप फेटाळला. तसेच, संशोधन केंद्रांमध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याचा मुद्दाही त्यांनी नाकारला. पुढील उपाययोजनांबाबत माहिती देताना मंत्रीमहोदय म्हणाले की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाईन पोर्टलवर 'पीएचडी ट्रॅकिंग प्रणाली' कार्यान्वित करण्यात आली असून, विद्यार्थ्यांना त्यांच्या अडचणींबाबत तक्रार नोंदविण्याची सुविधा देण्यात आली आहे. तसेच, विद्यापीठाकडून सर्व संशोधन केंद्रांचे शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरीक्षण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आवश्यक सोयीसुविधा पुरवणे हे संशोधन केंद्रांना बंधनकारक करण्यात आले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणाच्या चौकशीसंदर्भात विद्यापीठाने आवश्यक ती माहिती संकलित केली असून, शासनस्तरावरही कार्यवाही करण्यात येत असल्याचे चंद्रकांतदादा पाटील यांनी सभागृहात सांगितले. या चर्चेदरम्यान, पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. तसेच, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील देखरेख अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे आमदारांनी अधोरेखित केले.

